भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५५८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०८/२०१७

**१) ट्रॅक्टर लापरवाहीने चालवुन ट्रॉलीचे हुक तुटुन त्यात बसलेल्या तिघांना जखमी करण्यास व एक इसमाचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०४/०८/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रॅक्टर चे टॉली मध्ये मजुरांना घेवुन कारधा वरुन माटोरा येथे जात असतांनी ट्रॅक्टर हा भरधाव वेगाने, लापरवाहीने चालविल्याने रोडाचा झटका लागुन ट्रॉलीचे हुक तुटल्याने ट्रॉली मध्ये बसलेले गोटेफोडे, ज्ञानेश्वर हजारे, किशोर मारबते हे मजुर खाली पडुन जखमी करण्यास व मजुर हरिचंद्र श्रावण केवट वय ३५ वर्ष, रा. करचखेडा याचे मरणास कारणीभुत झाल्याने जखमीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३०४(अ),२७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गोपाले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अंधारात आपले अस्तित्व लपवुन चारचाकी वाहनासह मोबाईल, खनिज वाहतुक परवाना पावती व नगदी पैश्यासह मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०४/०८/२०१७ चे २२.५६ वा. दर. यातील सरतर्फे फिर्यादी हे आपले पोलीस स्टॉपसह पेट्रोलींग करीत असतांनी यातील आरोपी हा अंधारात आपले अस्तित्व लपवुन मारोती सुझुकी ए स्टार चार चाकी वाहनासह मिळुन आल्याने विचारपुस केली असता उडवा उडविचे उत्तर दिल्याने त्याचे ताब्यातील वाहनाची झडती घेतली असता २ मोबाईल सॅमसंग कंपनीचे रंग काळा व पांढरा, व नगदी १५४५००/—रु. व वाहन क्र. एमएच ३१ बीसी ७२९२ मौका खनिज वाहतुक परवाना पावती बुक असा एकुण ४१०५००/—रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. फुंडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १२२,१२४ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. पुसाटे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २६/०७/२०१७ चे १८.०० वा. दर. यातील फिर्यादी बंडु उर्फे रामसिंग धामसिंग सोलंकी वय ४० वर्ष, रा. चुल्हाड हा घराशेजारील बोरींगवर पाणी आणन्यास गेला असता व शेजाऱ्या सोबत बोलत असतांनी आरोपी क्र. १ नी तु आमच्या गोष्टी का करतेस असे म्हणुन भांडण कले व त्याच वेळी आरोपी क्र. २ हा सुध्दा तेथे आला व आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ करुन आरोपी क्र. २ ने हातातील काठीने फिर्यादीचे डोक्यावर, पाठीवर, कुशीवर, हातावर, मारुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी एक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२५,२९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**४) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०२/०८/२०१७ चे १०.३० वा. दर. यातील मृतक महीपाल चाको सोनवाने वय ५५ वर्ष, रा. किन्ही याने विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारादरमयान मरण पावल्याने पो.स्टे.भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे भंडारा येथे डॉक्टरी मेमो वरुन मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपाला व्दारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. गिन्हेपुंजे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लेंडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**५) सिमेंटचे नालीत पडुन डोक्याला जबर मार लागुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०५/०८/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील मृतक मारोती बाबुराव वदनकर वय ४७ वर्ष, रा. लाखोरी हा घरा समोरील सिंमेटचे नालीत पडल्याने त्याचे डोक्याचे मागचे भागाला जबर मार लागुन मरण पावल्याने फिर्यादी रामभाऊ रामदेव कमाने वय ५५ वर्ष, रा. पोलीस पाटील लाखोरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**६) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक ०५/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे कारधा व अडयाळ येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७ लिटर हा.भ. दारू किंमती ७००/–रु. तसेच जुगारातुन किंमती ५२५ /–रु. असा एकुण किंमती १,२२५ /रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०५/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक ०५, तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९२ केसेस करण्यात आलेल्या आहे.

06.8.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.